॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (दि. ४ ) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस' (केसीआयआयएल) तर्फे आदिवासी युवक-युवतींमधील उद्योजकता क्षमतांना चालना देण्यासाठी आयोजित 'आदिशक्ती' निवासी बूटकॅम्प ३० एप्रिल ते २ मे २०२६ दरम्यान यशस्वीरीत्या पार पडला. राज्यातील विविध भागांतील आदिवासी नवउद्योजकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

बूटकॅम्पचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, उद्योजक अनिल कांकरीया केसीआयआयएल चे संचालक डॉ. राजेश जवळेकर, प्रा. आशुतोष पाटील, प्रा. अरुण इंगळे, प्रा. के. एस. विश्वकर्मा, प्रा. भूषण चौधरी आणि डॉ. नविन खंडारे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. इंगळे यांनी आदिवासी युवकांसाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत सहभागींच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचे कौतुक केले, तर श्री. कांकरीया (प्रवर्तक, नवजीवन शॉपी) यांनी उत्पादनांचे प्रमाणीकरण व बाजारपेठेतील यशस्वी वाटचालीबाबत मार्गदर्शन केले.

तीन दिवसांच्या निवासी प्रशिक्षणात स्टार्टअपच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन देण्यात आले. टीम बिल्डिंग, एम व्ही पी विकास, प्रोटोटायपिंग, आर्थिक नियोजन, तसेच कायदेशीर अनुपालन आणि शासकीय योजनांची माहिती यांचा समावेश होता. सत्रे कृतीआधारित आणि संवादात्मक असल्यामुळे सहभागी त्यांच्या व्यवसाय संकल्पना अधिक प्रभावीपणे विकसित करू शकले.

या बूटकॅम्पमध्ये डॉ. अभिराम डबीर, डॉ. नविन खंडारे, अक्षय गव्हाणे, सीए अभिषेक कोठारी, डॉ. विकास गीते, सीए हितेश आगीवाल आणि समाधान पाटील यांनी मार्गदर्शक म्हणून योगदान दिले. कार्यक्रमाचा समारोप केसीआयआयएल चे संचालक प्रा. अरुण इंगळे, 'स्किल टू अर्न'च्या संस्थापक बुश्रा शेख यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केसीआयआयएल मधील अनिकेत पठाडे, योगेश पाटील, रोशनी जैन, चैतन्य मानूधने यांनी परिश्रम घेतले.

**बातमी क्र. २**

जळगाव (दि. ४ ) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने बुद्ध पौर्णिमेनिमित्त धम्म संगायन व खीरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम विचारधारा प्रशाळेच्या सभागृहात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. एस. टी. इंगळे, प्रमुख उपस्थिती राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ. पवित्रा पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.राकेश रामटेके, वाणिज्यशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. रमेश सरदार तसेच गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. के. एफ. पवार, बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख प्रा. संतोष खिराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा. अनिल डोंगरे यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची गरज अधोरेखित करताना सांगितले की, जगातील अनेक सभ्यता नष्ट झाल्या असून मानवी सभ्यता टिकविण्यासाठी बुद्धांचे विचार अत्यावश्यक आहेत. अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. एस. टी. इंगळे यांनी जागतिक शांततेसाठी बुद्ध विचारांची आवश्यकता असल्याचे नमूद केले. तर राजेंद्र नन्नवरे यांनी भारतातील बौद्ध वारसा जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली. यानंतर विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांनी गायलेले "प्रथम नमो गौतमा" व "वंदन गीत गातो" हे बुद्धगीत प्रोजेक्टरवर उपस्थितांना दाखविण्यात आले. पुढे "ओम नमो तथागता" (माधुरी महाजन), "हंस हा कुणाचा" (अनुराग जगदाळे), "नमस्कार घ्यावा अहो बुद्ध देवा" (डॉ. विजय घोरपडे) तसेच "कणाकणांनी ज्ञान वेचुनी" (प्रशिक बोदडे) ही गीते सादर करण्यात आली.

यावेळी विद्यापीठातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांच्याकडून खीरदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. दीपक खरात यांनी केले.

........................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ४ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता